# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

" (सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६)द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)"

(विद्या विभाग)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी क्रमांक: कार्यालय: ०७१२–२५३२०६३ फॅक्स : ०७१२–२५५५७०१


क्र. रातुमनावि/विद्या/१७/२४३ दिनांक २१ सप्टेंबर, १७

## : शुध्दीपत्रक :

सर्व संबंधिताच्या माहितीकरीता सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ अंतर्गत Faculty of Science & Technology, Commerce and Management, Humanities & Inter Disciplinary Studies या विद्याशाखेनुसार पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता निर्देश क्रमांक १३/२०१७ दिनांक ०६ जुन,२०१७ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. या निर्देशानुसार संबधीत विद्याशाखेंनी अभ्यासक्रमिका तयार केलेल्या असून या बाबत दिनांक २८ जुन,२०१७ रोजी विद्यापीठानी अधिसूचना क्रमांक रातुमनावि/विद्या/१७/१०४ सत्र २०१७–१८ पासून पुढे लागु करण्याकरिता निर्गमित केलेली आहे. सदर अधिसूचनेत समाजकार्य विषयाचा समावेश आहे.

करिता समाजकार्य अभ्यासक्रमाअंतर्गत येणाऱ्या M.S.W. तृतीय सत्रातील Specialization Paper-I४III (3T2) व (3T4) Group B(14 & 16) मधिल विषयाच्या अभ्यासक्रमिकेतील Contain मध्ये पुनरावृत्ती झाल्याने सदर अभ्यासक्रमिकेत सबंधीत विषयाच्या विशेष कार्य समितीने किरकोळ सुधारणा केलेली आहे. यास मा.अधिष्ठाता यांनी स्विकृती देउन नियमानुसार कार्यवाही घेण्यास्तव शिफारशीत केलेली आहे. सदर शिफारशीस मा.कुलगुरू महोदयांनी संबधीत अभ्यासमंडळ, आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा, विद्वत परिषद व व्यवस्थापन परिषदेच्या वतिने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६च्या कलम १२(७) अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. करिता हे शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात येत असून या प्रमाणे सबंधीतांनी कार्यवाही घ्यावी.

(टिपः–उपरोक्त अभ्यासक्रमाची सुधारीत अभ्यासक्रमिका विद्यापीठाच्या **www.nagpuruniversity.org** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेली आहेत.)

(पुरणचंद्र मेश्राम)
कुलसचिव